प्रेसनोट दिनांक १५/०५/२०२४

# शहर गुन्हे शाखेकडुन, चोरीचे एकुण ०९ गुन्हे उघडकीस.

---

अ) शहर गुन्हे शाखेचे **स.पो.नि. विजय पाटील व त्यांचे तपास पथक** हे सोलापुर शहर परिसरात मालाविषयी गुन्हे करणाऱ्या गुन्हेगाराचा शोध घेत असताना, बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक मुलगा हा चोरीची मोटार सायकल विक्री करण्याकरीता बाळे ब्रिज जवळ येणार असल्याची बातमी मिळाली. त्याप्रमाणे सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकाने मिळालेल्या बातमी प्रमाणे, विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन, तपास केला असता, त्याचेकडुन **जेलरोड पोलीस ठाणे, गुरनं.१०६/२०२४, भादविक ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली १०,०००/- रुपये किमतीची मोटार सायकल हस्तगत केली आहे.**

**तसेच,** शहर गुन्हे शाखेचे **स.पो.नि. विजय पाटील व त्यांचे तपास पथक** हे सोलापुर शहर परिसरात मालाविषयी गुन्हे करणाऱ्या गुन्हेगाराचा शोध घेत असताना, विजापुर वेस, सोलापुर येथील इसम नामे - मोहमंद समी मोहमंद सलीम बेलीफ, वय-३० वर्ष, रा.२१८ सिध्देश्वर नगर, भाग-२, मजरेवाडी, सोलापुर याचे ताब्यातुन **फौजदार चावडी पोलीस ठाणे, गुरनं.२८/२०२३, भादविक ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेली २५,०००/-रूपये किमतीची मोटार सायकल हस्तगत केली आहे.** त्याप्रमाणे, सपोनि/विजय पाटील व त्यांचे तपास पथकास मिळालेल्या बातमी प्रमाणे **महिला नामे- संगीता तुकाराम गुत्तेदार,** वय-५४ वर्ष, रा.कमला नगर, विजापुर रोड, सोलापुर हिस ताब्यात घेवुन, तिचेकडुन **विजापुर नाका पोलीस ठाणे, गुरनं.२२३/२०२४, भादविक ३८० प्रमाणे दाखल गुन्हयातील चोरीस गेलेले १,००,६५०/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिणे हस्तगत केले.**

ब) त्याचप्रमाणे, **सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकातील पोना/महेश शिंदे यांना,** गोपनिय बातमीदार यांचे मार्फत माहीती मिळाली की, एक इसम हा चोरीचे दागीने घेवुन, विक्री करण्यासाठी सलगरवस्ती येथुन, मोदी बोगदा मार्गे, सराफकट्टा, सोलापूर येथे जाणार आहे. प्राप्त बातमीचे अनुषंगाने, सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकामधील अंमलदार यांनी, बातमीतील ठिकाणी जाऊन, सापळा लावला असता बातमी प्रमाणे, **रोहित पंडीत हत्तुरे** वय-२६ वर्ष, व्यवसाय-मजुरी रा.सेटलमेंन्ट फ्री कॉलनी नंबर - ०२, सोलापूर सध्या-क्रांतीनगर, मुंडवा, पुणे यास ताब्यात घेतले. त्यानंतर नमूद इसमाची अंगझडती घेतली असता, त्याने, मोदी चौकी पाठीमागे असलेल्या जोशी अर्पाटमेंन्टचे दुसऱ्या मजल्यावरील एका घरामधुन **०४.०५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागीने, १०,०००/-रू रोख रक्कम व ०१ मोबाईल असा एकुण ४५,०००/- रू किंमतीची मुद्देमाल** चोरी केल्याचे कबुल केले. तसेच सदर सइमाने, सेटलमेंन्ट फ्रि कॉलनी नंबर ०३, सोलापूर येथे घरफोडी करून तेथुन १०,०००/-रू रोख रक्कम तसेच सोलापूर एस टी स्टॅन्ड येथुन ०१ मोबाईल फोन चोरी केल्याचे कबुल केले. अशा प्रकारे, **रोहित पंडीत हत्तुरे याचे कडुन ०१) सदर बझार पोलीस स्टेशन गु.र.नं.२२४/२०२४ भादवी ३८० प्रमाणे, ०२) फौजदार चावडी पोलीस स्टेशन गु.र.नं.२८३/२०२३ भादवी ३७९ प्रमाणे व ०३) सलगरवस्ती पोलीस स्टेशन गु.र.नं. ६३/२०२४ भादवी ४५४, ३८० प्रमाणे दाखल असलेले ०३ गुन्हे उघडकीस आले आहेत.** तसेच, रोहित पंडीत हत्तुरे यास, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर, सोलापूर जिल्हयातुन व उस्मानाबाद जिल्हयातुन तडीपार केले असताना, तो पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर हददीमध्ये मिळुन आल्याने, पोना/१३२६ महेश सुभाष शिंदे यांनी सदर बझार पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम -१४२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

क) त्याचप्रमाणे, **दि.१४/०५/२०२४ रोजी, सपोनि/श्रीनाथ महाडिक व त्यांचे तपास पथकातील पोह/अंकुश भोसले** यांना, गुप्तबातमीदाराने माहिती दिली की, एक इसम चोरी केलेला मोबाईल फोन घेवुन, डोणगांव रोड, सोलापुर याठिकाणी उभा असल्याची माहिती मिळाली. प्राप्त बातमीचे आधारे एका इसमास ताब्यात घेवुन, त्याचे नाव, वय, पत्ता विचारले असता, त्याने, त्याचे नाव- मुकेश आल्याप्पा मिसाळ, वय ३७, रा. अपसिंगा रोड, ता.तुळजापुर, जि.उस्मानाबाद, सध्या रा. सनत नगर, गुड शफर्ड इंग्लीश मिडीयम स्कुलच्या बाजुला, गैबीपिर नगर, सलगर वस्ती, सोलापुर असे असल्याचे सांगितले. त्यानंतर, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात **एक वीवो कंपनीचा ८०००/- रूपये किंमतीचा मोबाईल फोन** मिळुन आला. त्याप्रमाणे **सलगर वस्ती पोलीस ठाणे गु.र.क्र. ५४/२०२४ भादविक ३८० प्रमाणे दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.**

Scanned with CamScanner

ड) त्याचप्रमाणे, **सपोनि/जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकास** माहिती मिळाली की, मार्केट यार्ड या ठिकाणाहून चोरीस गेलेली मोटार सायकल घेवुन, एक संशयीत इसम हा, एस.बी.आय.कॉलनी भवानी पेठ, सोलापूर या परिसरातील बसवेश्वर जयंतीच्या महाप्रसाद वाटपाच्या कार्यक्रमाचे ठिकाणी येणार आहे. त्या अनुषंगाने सपोनि/ जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकाने सदर ठिकाणी सापळा रचुन नमूद इसमास ताब्यात घेतले असता, त्याचे नाव- **आकाश उर्फ अंडया मोहन वडतीले** वय- २८ वर्षे, राहणार- शिवगंगा मंदिराजवळ मराठा वस्ती, सोलापूर असे असून त्याचे ताब्यात चोरीची मोटार सायकल क्रमांक MH 13 DN 0227 एकुण किंमत ३०,०००/- रूपये ची मिळुन आली. त्याप्रमाणे **जेलरोड पोलीस ठाणे गु.र.नं. २१७/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३७९ प्रमाणे दाखल गुन्हा उघडकीस आला आहे.**

तसेच **सपोनि/ जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथक** यांनी, गुप्त बातमीदारामार्फत सोमवार पेठ येथे झालेल्या दिवसा घरफोडी मधील इसम हा हैद्राबाद रोड या ठिकाणी फिरत असल्यसाची माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने सपोनि/ जीवन निरगुडे व त्यांचे तपास पथकाने पुणे - हैद्राबाद महामार्गालगत, जुने फानुस हॉटलच्या पडक्या इमारती जवळ, सोलापूर जाणाऱ्या सार्वजनिक रस्त्यावर थांबले असता, त्या ठिकाणी विधी संघर्षग्रस्त बालक हा मिळुन आला. त्याचेकडे अधिक विचारपूस करता त्याने जेलरोड पोलीस ठाणे हद्दिमध्ये एका घरामध्ये दिवसा पैसे चोरी केल्याचे सांगितले त्या अनुषंगाने, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅटचे खिशामध्ये **२३,२७०/- रूपये मिळुन** आले. त्याप्रमाणे **जेलरोड पोलीस ठाणे गु.र.नं.१९७/२०२४ भा.दं.वि.सं.क. ३८० प्रमाणे गुन्हा उघडकीस आला आहे.**

**अशा प्रकारे, शहर गुन्हे शाखेने मोटार सायकल चोरीचे ०४, घरफोडी ०१ आणि इतर चोरीचे ०४ असे एकुण ०९ गुन्हे उघडकीस आणुन, एकूण ०२,४१,९२०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदरची कामगिरी मा. श्री.एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे/विशा), श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि/संजय क्षिरसागर, सपोनि/जीवन निरगुडे, सपोनि/विजय पाटील, सपोनि/श्रीनाथ महाडीक व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner